*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052*

# तत्त्ववेत्ते आणि पाठ्यलेखांचे अध्ययन - पाश्चात्य

# UNIT 1

# EDMUND HUSSERL

# एडमंड हुसेर्ल

1.1 तत्त्वज्ञान - एक काटेकोर विज्ञान (Philosophy as a rigorous science)

1.2 विज्ञेयमीमांसीय चिंतनपध्दती (Phenomenological Method)

1.3 विषयाभिमुखता / हेतूगर्भता (Intentionality)

---

## विज्ञेयमीमांसा - फिनॉमिनॉलॉजी (Phenomenology)

### तत्वज्ञानातील एक चळवळ

### प्रस्तावना

**फि**नॉमिनॉलॉजी ही एकोणिसाव्या शतकात उदय पावलेली तत्त्वज्ञानातील महत्वाची वैचारिक चळवळ असून विसाव्या शतकात तिला सुव्यवस्थित स्वरूप मिळाले. या चळवळीचे तत्त्वज्ञान मुख्यत: एडमंड हुसेर्ल (1859 - 1938) या जर्मन तत्त्ववेत्त्याने मांडले.नंतर मॉरिस मेर्लो पोन्ती[1], मार्टीन हायडेग्गर[2], जॉ पॉल सार्त्र[3] या तत्त्ववेत्त्यांनी या विचारप्रणालीत मोलाची भर घातली. दोन महायुध्दे आणि अनेक प्रकारचे वैज्ञानिक शोध यामुळे विसाव्या शतकातील युरोपीय-पाश्चात्य जीवन ढवळून निघाले होते. त्या पार्श्वभूमिवर ही चळवळ केवळ सैध्दान्तिक चिंतनापुरती मर्यादित न राहता सामाजिकशास्त्रे, साहित्यसमीक्षा, सौंदर्यशास्त्र, नाट्य, संगीत, कला इत्यादी क्षेत्रातही विस्तारली. या क्षेत्रात तिचे उपयोजन मूलगामी ठरले. विसाव्या शतकात विश्लेषक तत्त्वज्ञान आणि प्रस्तुतचे विज्ञेयमीमांसावादी तत्त्वज्ञान उदय पावले. येथे आपण विज्ञेयमीमांसावादी तत्त्वज्ञानाचा परिचय करून घेवू.

### व्युत्पत्ती व इतिहास

Phenomenology हा शब्द ग्रीक *phainomenon* पासून बनतो.त्याचा अर्थ appearance म्हणजे इंद्रियांना जाणवणारे आभास. पाश्चात्य तत्त्वज्ञानात प्रथम कान्ट[4] ने Phenomenology हा शब्द 'इन्द्रियसंवेद्य वस्तू व

---

[1]मॉरिस मेर्लो पोन्ती Maurice Merlo Ponty :14 मार्च 1908 - 03मे 1961. फ्रेंच तत्त्ववेत्ता. कार्ल मार्क्स, एडमंड हुसेर्ल आणि मार्टीन हायडेग्गर यांच्या प्रभावाखाली मेर्लो पोन्तीने आपले विचार मांडले. नंतर तो जॉ पॉल सार्त्रचा सहकारी बनला.

[2]मार्टीन हायडेग्गर Martin Heidegger :26 सप्टेंबर 1889 - 26 मे 1976. विसाव्या शतकातील एक अस्सल आणि महत्वाचा विचारवंत. विज्ञेयमीमांसा, अस्तित्ववाद, अर्थविवरणशास्त्र, राजकीय सिध्दान्त, मानसशास्त्र, धर्मशास्त्र इत्यादी अनेक क्षेत्रात त्याने मूलभूत भर घातली. उत्तराधुनिक विचारसरणीवर (theories of postmodernity) त्याचा चांगलाच प्रभाव होता.हिटलरच्या नाझीपक्षातील त्याच्या सहभागामुळे हायडेग्गर वादग्रस्त बनला.त्याचा 'तत्त्वज्ञान म्हणजे विज्ञेयमीमांसीय वस्तुमीमांसा'(Philosophy as Phenomenological Ontology) हा सिध्दान्त महत्वाचा मानला जातो.

[3]जॉ पॉल सार्त्र Jean Paul Sartre : 21 जून 1905 - 15एप्रिल 1980. फ्रेंच अस्तित्ववादी तत्त्वज्ञ, नाटककार, कादंबरीकार, पटकथालेखक, राजकीय कार्यकर्ता आणि समीक्षक.

[4]कान्ट Immanuel Kant: 22 एप्रिल 1724 - 12 फेब्रुवारी 1804 महत्वाचा जर्मन तत्त्ववेत्ता

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052*



घटना' या अर्थाने वापरला.लॅटीन भाषेत "Phenomenologia" हा शब्द 1736 साली प्रथम ओटींजर[5] या धर्म तत्त्ववेत्त्याने वापरला.त्यानंतर त्याचा जर्मन शब्द "Phänomenologia" हा 1764 साली लॅम्बर्ट[6] याने 'भासाची उत्पत्ती' या अर्थाने (Theory of Illusion) वापरला.1807 मध्ये हेगेल[7] या चिद्वादी तत्त्वज्ञाने Phenomenology of the Spirit (*Phänomenologie des Geistes*)) या ग्रंथांच्या शीर्षकात Phenomenology हा शब्द वापरलेला आहे. त्याचा अर्थ मनाचा चिकित्सक व शास्त्रीय अभ्यास असा आहे.1889 साली ब्रेन्टानो[8] याने 'वर्णनात्मक मानसशास्त्र' या अर्थाने हा शब्द वापरला.

स्कॉटिश तत्त्वज्ञ विल्यम हॅमिल्टन[9] याने Phenomenology या शब्दाचा अर्थ 'मनाचा शुद्ध वर्णक अभ्यास' असा केला. तर हार्टमन[10] याने Phenomenology याचा अर्थ नैतिक जाणिवेचे संपूर्ण वर्णन, असा केला आहे.

सर्वसाधारणपणे Phenomenology या शब्दासाठी मराठीत 'मानसघटनाशास्त्र' हा शब्द आजपर्यंत वापरला गेला आहे. पण Phenomenology या शब्दाचा नेमका अर्थ व्यक्त करण्यासाठी मानसघटनाशास्त्र हा शब्द संपूर्णपणे पर्याप्त आहे, असे म्हणणे कठीण आहे. Phenomenology या शब्दाचे मराठी भाषांतर म्हणून 'दृश्यप्रपंचशास्त्र', 'रुपविवेचनवाद', 'अनुभूतप्रपंचवाद', 'घटनाविज्ञान' अनेक पर्यायी मान्य केले गेले. यांपैकी कोणताही एक परिभाषिक शब्द अर्थाच्या दृष्टीने मूळ शब्दाशी पूर्णपणे व अचूकपणे कितपत जुळणारा आहे याविषयी शंका आहे.[11] तथापि गेल्या काही वर्षात नवे पर्यायी शब्द तयार करण्यात आले. त्यात 'प्रत्ययवेधविज्ञान' (प्रत्ययार्थमीमांसा),'संज्ञामीमांसा' आणि 'विज्ञेयमीमांसा' असे पर्यायी शब्द[12] पुढे आले. यापैकी 'विज्ञेयमीमांसा' हा शब्द यथार्थ वाटल्याने तो येथे स्वीकारला आहे.

Phenomenology आणि Phenomenologism हे दोन्ही शब्द Phenomenon पासून बनतात, हे खरे आहे. तथापि दोन्ही ठिकाणी त्यांचा अर्थ वेगवेगळा आहे. Phenomenologism हा 'इझम', म्हणजे वाद किंवा सिध्दान्त आहे तर Phenomenology ही एक 'लॉजी'[13], म्हणजे शास्त्र किंवा मीमांसा आहे.या दोहोतील फरक पुढीलप्रमाणे:

---

[5]फ्रेडरिक ख्रिस्तोफ ओटींजर Friedrich Christoph Oetinger : 02मे 1702 - 10 फेब्रुवारी 1782.जर्मन धर्म तत्त्ववेत्ता.

[6]जोहान्स हाइन्रिश लॅम्बर्ट Johann Heinrich Lambert : 26ऑगस्ट1728 - 25सप्टेंबर1777.स्वीस गणितज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ आणि खगोलतज्ञ.

[7]हेगेल Georg Wilhelm Friedrich Hegel : 27ऑगस्ट1728 - 25नोव्हेंबर1831, जर्मन तत्त्ववेत्ता. जर्मन चिद्वादाचा ( जर्मन आयडियालिझम) निर्माता.

[8]फ्रान्झ ब्रेन्टानो Franz Clemens Brentano: 16 जानेवारी 1838 - 17 मार्च 1917, प्रसिध्द जर्मन तत्त्ववेत्ता आणि मानसशास्त्रज्ञ. याने ' मानसशास्त्राचे तत्त्वज्ञान' ही नवी ज्ञानशाखा विकसित केली.

[9]विल्यम हॅमिल्टन William Hamilton: 08 मार्च 1788 - 06 मे 1856.

[10]कार्ल रॉबर्ट एडुआर्ड फॉन हार्टमन Karl Robert Eduard Von Hartmann : 23 फेब्रुवारी 1842 - 05 जून 1906, जर्मन तत्त्ववेत्ता.

[11]"मानसघटनाशास्त्र'', *पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास*, खंड 3, पान 1747, प्रा. डॉ. ग. ना. जोशी, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 30, 1975

[12]*फिनॉमिनॉलॉजी*, परामर्श खंड 23 अंक 2-3, पुणे विद्यापीठ,तत्त्वज्ञान विभाग, पुणे -7

[13] ज्या अभ्यासविषयाला स्वत:ची संशोधन पध्दती असते, तिला 'लॉजी' logy हा प्रत्य लागून त्या विषयाचे, विद्याशाखेचे नाव तयार होते. जसे Sociology, Zoology, Biology इ. अर्थात नेहमी असेच घडेल असे नाही. उदा. Chemistry, History इ.येथे Phenomenology म्हणजे नवा स्वतंत्र विषय अथवा विद्याशाखा असे अभिप्रेत नाही, तर स्वतंत्र संशोधन पध्दती देणारा तत्त्वज्ञानात्मक स्वरूपाचा विषय असा अर्थ अपेक्षित आहे.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

Phenomenologism या सिध्दान्तात म्हणजे संवेद्य - संवेदनेचा, अनुभवाचा साक्षात विषय असलेले असे काहीतरी. त्यानुसार त्या संवेद्यालाच, विषयालाच अस्तित्व असते, त्यापलिकडील आत्मा, स्वर्ग, ईश्वर इत्यादीला अस्तित्व नसते. Phenomenology मध्ये मात्र Phenomenon या शब्दाचाच अर्थ व्यापक आहे. त्याचा अर्थ 'जाणिवेचा साक्षात विषय होणारे काहीही' असा होतो. प्रत्यक्ष जग, घटना, वस्तू, व्यक्ति आणि प्रातिभज्ञानाला (intuition) जाणवणारे 'सार - सारांश' (essences) सुध्दा Phenomenon येथे मानले जातात. जाणिवेच्या विषयांना 'विज्ञेय' म्हणता येईल, म्हणून Phenomenology म्हणजे 'विज्ञेयमीमांसा' असा शब्द मराठीत स्वीकारणे योग्य होईल.[14]

Phenomenology चा संबंध Phenomena या शब्दाशी आहे हे खरे, परंतु हुसेर्लने त्याच्या विचाराची एक विशिष्ट पद्वती तयार केली, तिला विज्ञेयमीमांसीय पद्वती Phenomenological Method म्हणतात, आणि या पद्वतीनुसार विचार करणे हे एक प्रकारचे नवे तत्वज्ञान तयार झाले. या पद्वतीचे मुख्य अंग वर्णनात्मक, विश्लेषणात्मक आणि तर्कशुद्व विचार करणे हे असून त्याचे उद्दिष्ट एखादी कल्पनानिर्मित सत्ताशास्त्रीय प्रणाली किंवा विश्वविषयक प्रणाली तयार करणे, हे नाही. 1900 साली हुसेर्लने या पद्वतीचा उपयोग करुन Phenomenology हे एक नवे तत्वज्ञान घडविले. विज्ञेयमीमांसा हे विश्वदर्शन किंवा जीवनदर्शन घडविणारे भव्य तत्वज्ञान नाही, तर ते एक प्रकारचा दृष्टिकोन, अभिवृत्ती आणि विचार करण्याची व मांडण्याची विशिष्ट पद्वती आहे. आणि तिच्यात काहीही गृहीत न धरता तर्कशुद्व रीतीने विश्लेषण व वर्णन करणे याला मध्यवर्ती महत्व आहे. व्यापक अर्थाने घेतलयास Phenomenologyचा अर्थ दिलेल्या विषयाचा 'वर्णक अभ्यास करणे' असा अर्थ आहे. आणि हुसेर्लपासून या पध्दतीचे तत्वज्ञानाच्या एका चळवळीत रूपांतर झाले.

-----------------------------------------------------------

# एडमुंड हुसेर्ल

## प्रास्ताविक :

**मा**नसघटनाशास्त्राच्या (Phenomenology) चळवळीला विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जर्मनीत प्रारंभ झाला. ब्रेन्टनो आणि मायनाँग यांनी जरी त्याची बीजे पेरली होती तरी ख-या अर्थाने मानसघटनाशास्त्राच्या मुख्य प्रणेता व संस्थापक एडमंड हुसेर्ल हा होय. त्याने सुमारे अर्धे शतक या किचकट विषयावर सखोल चिंतन अणि लेखन करुन मानसघटनाशास्त्राची शास्त्रीय व पध्दतशीर मांडणी केली. 1900 व 1901 या दोन वर्षात या विषयावरील Logical Investigations हे दोन ग्रंथ त्याने प्रसिद्ध केले. आणि तेव्हापासून त्याने गटिंगेन आणि म्युनिच येथे आपलया या नव्या विचारसंपदायाची पक्की स्थापना केली.

हुसेर्लने 1916 मध्ये फायबुर्गला प्राध्यापकाची जागा स्वीकारली. 1923 मध्ये तो हायडेगर मार्बुर्गला गेला, आणि त्याने आस्तिवादी (Existentialist) चळवळीचे नवे दालन उघडले. 1929 मध्ये हुसेर्ल निवृत्त झालयावर त्याची जागा हायडेगने घेतली. खरे म्हणजे मानसघटनाशास्त्र आणि अस्तित्ववाद यांचे मूळ एकच असून त्या एकाच प्रकारच्या प्रवृत्तीला देण्यात आलेलया भिन्न प्रकारच्या प्रतिकिया व्यक्त करतात. हुसेर्ल आणि हायडेगर यांच्यात मतभेद व दुरावा निर्माण झाला व त्याचे पर्यवसान फ्रायबुर्ग मानसघटनाशास्त्रांमध्ये अतीतवादी (Transcendental) आणि अस्तित्ववादी

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

---
[14] "फिनॉमिनॉलॉजी - प्रत्ययार्थमीमांसा?" डॉ. प्रदीप गोखले, *फिनॉमिनॉलॉजी*, पान 174 -76, उपरोक्त.

(Existential) असे दोन भिन्न विचारसंप्रदाय तयार होण्यात झाले. या दोघातील सैदान्तिक मतभेदाचे नेमके स्वरुप स्पष्ट करण्यात आलेले नाही.

**Edmund Gustav Albrecht Husserl**
(April 8, 1859 – April 26,1938)
Philosopher, mathematician and
the founder of the 20th century philosophical school of phenomenology



## तात्विक अन्वेषण :

हुसेर्ल तत्वचिंतन व तत्वज्ञानाचे लेखन करणे याकडे केवळ एक व्यवसाय या दृष्टीने पाहात नव्हता. तत्वचिंतन ही त्याच्या दृष्टीने एक अत्यंत गंभीर गोष्ट होती. केवळ रिकामपणाचा उद्योग किंवा करमणूक किंवा बौदिक कसरत म्हणून तो तत्वचिंतनाकडे पाहात नव्हता.

हुसेर्लच्या मतानुसार तत्वज्ञान हे सर्वश्रेष्ठ व आद्य विज्ञान आहे. आणि तत्वज्ञान हे विज्ञान मानण्यासाठी त्याच्यात नि:संदिग्ध आणि वस्तुनिष्ठ सत्ये असण्याची आवशयकता आहे. याबाबतीत त्याच्या मनात तिळमात्र शंका नव्हती. ज्या सत्यांचे अन्वेषण हुसेर्ल तत्वज्ञानामार्फत करीत होता ती सत्ये त्यांचा या किंवा त्या विशिष्ट विषयांशी जाणीव होत असते. हे गृहीतक हुसेर्ल अमान्य करुन आपलया Ideas for a Pure Phenomenology and Phenomenological Philosophy या ग्रंथात म्हणतो की प्रत्येकाला सातत्याने कलपना आणि सारे दिसत असतात, आणि आपली जाणीव केवळ विशिष्टांपुरती मर्यादीत नसते. हुसेर्लची मानसघटनाशास्त्रीय अभिवृत्ती निसर्गविज्ञानाच्या अभिवृत्तीपेक्षा वेगळी आहे. निसर्गविज्ञान ज्या विषयांचा विचार करते त्यांना वास्तव समजत असते. निसर्ग-विज्ञान वस्तू व घटना यांना स्वत:चे, सवतंत्र व ज्ञातृनिरपेक्ष अस्तित्व असते. याविषयी शंका घेत नाही. यातील फरक ईशवरावर विशवास ठेवणे आणि माझा ईशवरावर विशवास आहे असे समजणे यातील फरकासारखाच आहे.

हुसेर्लचे मानसघटनाशास्त्र हे मानसशास्त्र ज्या प्रत्यक्ष अनुभवगभ्य गोष्टीचा अभ्यास करते त्याचा विचार करीत नाही, तर ते त्याच्या फक्त पदतीच्या बाबतीत वर्णनात्मक असते. त्याला पूर्ण निशिचिती मिळू शकते, कारण जाणिवेत जे अंतर्हित असते त्याच्या पलीकडे जाण्याचा ते दावा करीत नाही. तसेच त्याच्या ठिकाणी सार्वदेशिकता असते, कारण ते वस्तुनिष्ठ संदर्भाचा विचार करते. त्यात अमुक एका विशिष्ट विषयापुरते ते मर्यादित न राहता सर्वसामान्य सैदान्तिक व व्यावहारिक वस्तुनिष्ठ संदर्भाचा ते विचार करीत असते. हुसेर्लने आपलेया Logical Investigations मध्ये दाखविलयाप्रमाणे तत्वज्ञानातील प्रशनांकडक त्याचा पाहण्याचा दृष्टीकोन पूर्वग्रहविरहित, शास्त्रीय आणि मानसघटनाशास्त्रीय स्वरुपाचा आहे. त्यात मानसशास्त्रीय पद्धतीऐवजी तर्कशुद्व रीतीने विचार व विशलेषण करण्याला प्राधान्य आणि प्राथम्य असते.

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052*



हुसेर्लची पद्वती प्रामुख्याने तर्कप्रधान असून ती सूक्ष्म विशलेषण व भेदन करण्यापत ब्रेन्टोनोच्या पद्वतीसारखी आहे. त्यातून अनुभववाद टिकण्यासारखा नाही हे हुसेर्लला निर्दिशित करुन दाखवायचे आहे. हुसेर्लची पद्वती मानसशास्त्रशी खूपच निगडीत वाटत असली तरी तो मानसशास्त्रवादाचा (Psychologism) निषेध करतो.

## मानसघटनाशास्त्र आणि संवेद्यवाद :

मानसघटनाशास्त्र आणि इंदियार्थवाद किंवा सेवेद्यवाद यांच्यात गलत्त केली जाण्याची शक्यता आहे. पण त्यांच्यातील फरक लक्षात घेऊन तशी गल्लत करता कामा नये.
इन्दियार्थवाद किंवा संवेद्यवाद यानुसार मानवाला स्वरुपवस्तूचे किंवा अंतिम सत्तेचे ज्ञान होऊ शकत नाही. स्वरुपवस्तु ज्ञानाच्या शक्यतेच्या पलीकडे असते. आणि जगाचे किंवा सत्तेचे होणारे ज्ञान हे फक्त सत्तेच्या भासंरुपापुरते किंवा संवेद्य गुणधर्मापुरते मर्यादित राहते. कान्टच्या सिद्वान्तानुसार मानवाची बुदधी व मन आतिंम सत्तेला किंवा स्वरुपवस्तूला तिच्या मूळ स्वरुपास जाऊन पोहोचू शकत नाही. व तिचे मुळात असते तसे स्वरुप मानवी ज्ञानशक्तीला अगम्य असते.

हुसेर्ल मानसघटनाशास्त्राची व्याख्या ज्ञातुसापेक्ष आणि व्यक्तिनिष्ठ प्रकियांचे (Subjective processes) वर्णन अशा शब्दात करतो. अशा रीतीने तो अभ्यासाविषयाच्या बाबतीत मानसशास्त्राला मानसशास्त्राची समव्यापी बनवितो. मात्र या दोन शास्त्रांतील मुख्य फरक असा सांगता येईल की मानसशास्त्र घटनांचे उपवादन त्यांची उत्पत्ती आणि कारकसंबंध यांच्या अनुषंगाने करते, तर मानसघटनाशास्त्र मानसशास्त्रीय घटनांच्या अनुभवायला मिळणा-या अवस्थांचे फक्त विशलेषण आणि वर्णन करते, कोणत्याही तात्विक आणि ज्ञानशास्त्रीय गृहितकांचा आणि निष्ठांचा आधार न घेता आणि त्यांच्यापासून स्वतंत्रपणे व्यक्तीच्या मनात घडणा-या घटनांचे जसेच्या तसे [यथार्थ] वर्णनात्मक विशलेषण इतर सर्व शास्त्रांना अत्यावशयक आणि पायाभूत असते. त्याच्या मते सर्व शास्त्रांच्या अभ्यासाला ॲरिस्टॉटलच्या मते तर्कशास्त्र जसे अत्यावशयक व पायाभूत असते तसे मानसघटनाशास्त्र इतर सर्व शास्त्रांना पायाभूत आणि महत्वाचे असते.

हुसेर्लच्या मतानुसार मानसघटनाशास्त्र हे ज्ञाताकेंद्री (Subjectivistic) आहे. कारण त्याचे अन्वेषण प्रामुख्याने कातेशियन पद्वतीप्रमाणे अंह (Ego) आणि त्याची पुरोधाने यांवर आपले लक्ष केंद्रीत करीत असते. मानसघटनाशास्त्रीय अन्वेषण करताना हुसेर्लच्या मते देकार्त मध्येच थबकला. हुसेर्लच्या मते मानसघटनाशास्त्र हे मनाच्या विविध अवस्थांचे परीक्षण करीत असले तरी त्याचे कार्य मानसशास्त्रीय किंवा मानसिक (Mentalistic) स्वरुपाचे नाही. मानसघटनाशास्त्राचा विषय लॉक आाणि बर्के यांनी पुरस्कारलेलया मानसशास्त्रीय कलपनांचे क्षेत्र नसून अहंला त्याच्या अनुभव घेण्याच्या प्रकियेत जे कल्पनारुप अर्थ (Ideal meanings) आणि सार्वदेशिक संबंध कळतात ते त्याचे खरे अभ्यासाचे विषय होत. तशीच त्याने त्याचे समकालीन स्टुम्फ आणि लिप्स यांच्या मानसशास्त्रवादावर जोरदार हलला चढविला, कारण त्याला तर्कशास्त्राचे मानसशास्त्रात रुपांतर करणे व तर्कशास्त्राला मानसशास्त्रापुढे गौणत्व देणे मान्य नव्हते. अनुभवांतर्गत आदर्श संबंधात्मक घटकांचे बुदधीवादी रीतीने अन्वेषण करण्याचा स्वातंत्र्याचा तो आग्रह धरतो. हुसेर्लच्या मानसशास्त्राला वास्तव मानसिक अवस्थांचा अभ्यास करणारे एक स्वतंत्र शास्त्र म्हणून, विरोध नाही. त्याचा मानसशास्त्रवादाला जो विरोध आहे तो मानसशास्त्र तर्कशास्त्रावर कुरघोडी करुन आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा जो प्रयत्न व दावा करते केवळ त्या गोष्टीला आहे.

## जाणिवेचे स्वरूप :

ब्रेन्टोनो आणि मायनॉग हे जाणीव ही जाणीव प्रामुख्याने वस्तुनां फुटलेलया कीटकाच्या नांगीसारखी जणू संस्पर्शके (Tentacles) असतात असे मानतात. त्यामुळे जाणीव ज्या विषयांची असते व ज्या विषयांशी सलंग्न असते त्यांच्याशिवाय आणि त्यांच्यापासून अलिप्त रीतीने जाणिवेचा अभ्यास करता येत नाही. जाणिवेच्या अभ्यासात जाणिवेपलीकडे असणा-या विषयांची जाणीव (Awareness) अपरिहार्यपणे अंतुर्भत होतेच, आणि जाणिवेचे विषय जाणिवेचे भाग बनून राहतात. विषयांच्या जाणिवेच्या वर्णनालाच हुसेर्ल मानसघटनाशास्त्र म्हणतो.

परंतु फुलर म्हणतो की असे वर्णन करता येणे शक्य आहे का जर सर्वच जाणीव केवळ वस्तुंची [विषयांची] जागरुकता (Awareness) असेल तर त्या जागरुकतेचे अन्वेषण करण्यासाठी मागे काही शिललक उरेल तरी का मानसघटनाशास्त्रच्या दृष्टीने जाणीव ही विषयांभोवती गुंडाळलेलया आणि त्यांना चिकटून राहाणा-या संस्पर्शकांचा पुंजका नसते, तिला केवळ तिच्या विषयांचीच जाणीव नसते, तर ती विमर्शक विचार करणारी असून तिला स्वत:चीही जाणीव असते, आणि आत्मा हा प्रामुख्याने आपलया व्यतिरिक्त इतर वस्तुंची जाणीव असतो याची तिला सतत जाणीव असते. आणि तरीही स्वत:चा अभ्यास करताना तिला स्वत:ला आपली हालचाल थांबवून आणि स्वत:चे भान विसरुन तिची वस्तुंवरील पकड सोडावी लागत असते. मानसघटनाशास्त्र जाणिवेचे स्वरुप आतून भावू शकत नाही. आणि तिचा विषयांशी असणारा संपर्क अनुभवू शकत नाही. आणि तिचे कार्य प्रसुप्तावस्थेत असलयामुळे मानसशास्त्राप्रमाणे जाणिवेच्या चालणा-या सर्वसामान्य कार्याचे मानसघटनाशास्त्र निरीक्षणही करु शकत नाही. मानसघटनाशास्त्र हे विषयांच्या भोवती गुंडाळलेलया स्पस्पर्शकांप्रमाणेच जे विषय निर्जीव बनलेले असतात त्यांची उत्तरीय तपासणी करीत असते. आणि विषय आणि त्यांची संस्पर्शके एकाच प्रकारची असलयामुळे संस्पर्शकांचे विस्तारलेले रुप असते. जाणीव ही जिवंत संवेदनेने खरोखरच आपलया विषयांना स्पर्श करण्याऐवजी आपलया विषयांचे बाहेरुन निरीक्षण करीत असते. आणि संवेदना नष्ट झालेलया संस्पर्शकांचा त्यांच्या विषयांशी [वस्तुशी] संबंध असतो याचे ती बाहेरुन निरीक्षण करीत असते.

## तटस्थ निरीक्षण :

मानसशास्त्र एखाद्या त्रयस्थाप्रमाणे ज्ञातृज्ञेय संबंधातून आतून असणारी जाणीव व क्रिया तात्पुरती का होईना पण काढून घेऊन विषयांकडे अनासक्त व निर्विकारपणे आणि वस्तुनिष्ठ रीतीने पाहू शकते, आणि ज्ञातृज्ञेय संबंधावर बाहेरुन आपले लक्ष केंद्रीत करु शकते. मानसघटनाशास्त्र जर काही करीत असेल तर ते एवढेच की ते बाहेर उभे राहून मानसशास्त्रीय घटनांकडे पाहते. आणि त्याला जे दिसते त्याचे त्रयस्थांना व प्रेक्षकांना वर्णन करुन सांगते. शिवाय त्याची वर्णने सामान्यत: जाणिवेच्या आकारिक रचनांविषयी असलयामुळे त्यांना सार्वदेशिक युक्कता असते. आणि ती अचूक व प्रमाणभूत असतात.

## अर्थ :

मानसघटनाशास्त्रीय अभिव्यक्तीनुसार आपणांस काय दिसते हुसेर्लच्या मते जाणीव वस्तूंना अभिमुख असते. जाणिवेत मुख्यत: ज्ञात्याचा ज्ञेय विषयांशी संबंध अनुस्यूत असतो. वस्तुंचा विचार करणे किंवा वस्तूवंर लक्ष केंद्रित करणे म्हणजे त्यांच्या अर्थाची (Meaning) जाणीव होणे असते. वस्तूंकडे लक्ष देणे म्हणजे त्यांना अभिप्रेत करणे (Intending) असते, म्हणजेच इतर वस्तूंना वगळून विशिष्ट वस्तूंवर लक्ष केंद्रितं करणे असते. म्हणून हुसेर्लच्या मते वस्तूंचा अर्थ कळणे किंवा त्याना अभिप्रेत करणे अशी जाणिवेची व्याख्या करता येईल. अर्थ कोणालातरी कळत व कळवयाचा असतो. कशाशी तरी (Something) किंवा कोणत्याही वस्तुशी व्यक्ती ज्या रीतीने वागते किंवा कृती करते त्यातून तिचा अभिप्राय (Intention) व्यक्त होत असतो. म्हणजे व्यक्तीला एखादी वस्तू आवडते किंवा जिच्याविषयी घृणा वाटते, परकेपणा वाटतो, तिच्यावर व्यक्ती विचार करते, किंवा तिला वस्तूचे स्वरुप प्रतित होते त्याला अनुसरुन ती तिच्यावर किया करते, तिचा उपयोग करते वगैरे. व्यक्तीला बाहय वस्तू व घटना यांचा नुसता अर्थच कळत नाही तर तिचे वैशिष्टय किंवा महत्वही जाणवते, आणि त्या महत्वाला अनुसरुन व्यक्ती त्या वस्तुशी अर्थपुर्ण रीतीने व आपलया अपेक्षेप्रमाणे व्यवहारीक संबंध प्रस्थापित करते.

म्हणजे जाणीव ही व्यक्ती आणि वस्तू, अंह आणि विषय या दोन टोकांना जोडणारी व त्यांच्या दरम्यान बसणारी गोष्ट असते. अहंच्या बाजूला विशवास ठेवणे, संशय घेणे, [सहानुभूतीने] विचार करणे, संकलप करणे

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052*

यांसारख्या विविध प्रकारच्या गुणात्मक कियांतून व्यक्त होणारी व्यक्तिनिष्ठ अभिवृत्ती असते. आणि तिची अभिव्यक्ती, आकलन, पुरोधान, प्रतिरुपण किंवा प्रतिकात्मक मांडणी यांच्या रुपांनी होते आणि वस्तुंच्या दुस-या बाजूला खुद्र वस्तू [विषय] आणि तिचे कल्पनारुप स्वरुप किंवा अर्थ असतो. या दोघांच्या दरम्यान प्रतिमासारखे इंद्रियप्रदत्त व इंद्रियानुभवाचा आशय असतो.

हुसेर्लच्या मतानुसार विषयांच्या ठिकाणी काहीतरी अर्थ व्यक्त करण्याची क्षमता असली पाहिजे. आपणांस विषय जो अर्थ सांगतात ते त्यांचे स्वरुप असते. परंतु जेव्हा आपण उपस्थित नसू तेव्हा त्यांचे महत्व [वैशिष्टयपूर्ण अर्थ ] नष्ट होत नाही. म्हणजे विषय किंवा वस्तू यांचे अस्तित्व चालू राहते. म्हणजे वस्तूंचा समग्र अर्थ आपण कधीच संपवू शकत नाही. आपण विषयाकडे केव्हा या तर केव्हा त्या अशा विविध दृष्टिकानातून व भूमिकांवरुन पाहू शकतो. म्हणून त्यांचा आपणांसाठी नेमका व संपूर्ण अर्थ कोणता आहे आणि कोणता असू शकेल हे निशिचत करणे कठीण असते. म्हणून त्यांच्या अर्थाविषयी आपलयाकडून चुका होत असतात. अर्थाच्या रचनेत खालील घटक अंतर्भुत असलेले आढळतात.

1] अर्थ प्रतीत होण्यासाठी किंवा कळण्यासाठी 'कोणीतरी' (Some one) म्हणजे अंह  असला पाहिजे आणि
2] तो अंह किंवा ज्ञाता त्या वस्तुविषयी किंवा विषयाविषयी एखादी विशिष्ट अभिवृत्ती [सैद्वान्तिक किंवा व्यावहारिक] धारण करतो.
3] जो अर्थ त्या वस्तुमध्ये व्यक्त किंवा साकार होतो तो अर्थ ज्ञात्याच्या ठिकाणी असला पाहिजे
4] व्यक्तीने विशिष्ट अर्थ मान्य केला पाहिजे. म्हणजे तिला त्या वस्तुचे त्यानुसार स्वरुप समजेल.
5] त्या वस्तुसंबंधी व्यक्तीच्या मनात विशिष्ट अभिप्रेत अर्थ असला पाहिजे.
6] आणि तिच्या मनातील अर्थ कोणत्यातरी विषयासंबंधी किंवा वस्तुसंबधी असला पाहिजे.

## अर्थभिन्नता :

वस्तू व घटना [विषय] विविध व्यक्तींना विविध परिस्थितीत वेगवेगळया रीतीनी दिसतात. जाणवतात आणि त्यांचा एकच किंवा विभिन्न अर्थ असतो असे नाही. व्यक्ती तितक्या प्रकृती असतात. एकच वस्तू भिन्न वेळी एकाच व्यक्तीला भिन्न रुपांनी दिसेल, जाणवेल आणि तिचे अनेक व भिन्न अर्थ तिला जाणवतील. व्यक्तीच्या मानसिक अवस्था, आवडीनिवडी, अभिवृत्ती, दृष्टीवोन, मनाचे मूड व चढउतार यांनुसार तिला अनुभवायला मिळणा-या वस्तुंचे व घटनांचे अर्थ बदलत जातात. असा सर्वाचांच नित्याचा अनुभव आहे. तेव्हा वस्तूनां मनाबाहेर स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व असते यात शंकाच नाही. परंतु त्यांचे अभिप्रेत अर्थ मात्र असंख्य व विविध असू शकतात. हेही तितकेच खरे आहे. म्हणून ज्या विशिष्ट परिस्थितीत व्यक्तीला एखादी वस्तू व घटना जशी दिसते, भासते, जाणवते आणि तिचा अर्थ समजतो त्या वेळी तिचे ते स्वरुप व तो विशिष्ट अर्थ खरा असतो असे मान्य करावयास पाहिजे. असे मानसघटनाशास्त्र म्हणते. ते वस्तूंचे जे साक्षात स्वरुप, गुणधर्म व अर्थ असतात त्यांच्या पलीकडे न जाता त्यावेळी ते प्रतीत होईल तेवढे त्या वेळेपुरते तरी सत्य म्हणून मान्य करावे. असे हुसेर्लचे म्हणणे आहे. हुसेर्ल म्हणतो की, वस्तूंची बदलणारी भिन्न व सवैद्य रुपे जशी सत्य असतात तशीच त्यांचे स्थिर आकार, सार्वदेशिक व नित्य गुणधर्म व्यक्त करणारी सारेही सत्य असतात. सारे ही विचारांचे स्वयंवती विषय असलयामुळे त्यांची रचना इन्द्रियानुभवापासून केली जात नाही. सारांचे प्रत्यक्ष अंतर्ज्ञान होत असते असे हुसेर्ल मानतो.

## वस्तू : अर्थाची समग्रता :

वस्तू किंवा विषय हा स्वत: नेमका कसा असतो हा मूलभूत प्रशन आहे. त्याला थोडक्यात उत्तर दयायचे झालयास कोणतीही वस्तू किंवा विषय त्याची जी विविध रुपे व अर्थ आपणांस कळतात व प्रतीत होतात, आणि आपण

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052*



त्यांचे जे विविध अर्थ लावतो व त्यात विविध अर्थ पाहतो ते सर्व मिळून, म्हणजे त्यांची समग्रता म्हणजे ती वस्तू किंवा तो विषय असतो. त्याचे वेगवेगळे अर्थ वेगवेगळया व्यक्तीना वेगवेगळया प्रसंगी त्यांच्या आवडी-निवडीप्रमाणे, वृत्ती-प्रवृत्तीप्रमाणे कमी अधिक तीव्रने कळतात व जाणवतात. काहीना त्याचे आगळे दर्शन होऊन विशेष महत्व जाणवते व जो त्या वस्तुच्या किंवा घटनेच्या अर्थात आपलया दृष्टीकोनानुसार भर घालतो किंवा वजावट करतो, या सर्व वास्तव घटना लक्षात घेऊन आपण असे म्हणू शकतो की, कोणत्याही वस्तूचे किंवा घटनेचे [विषयाचे] समग्र, अभिन्न व अशेष स्वरुप [गुणधर्म] व अर्थ आपणांस कोणत्याही एका वेळी पूर्ण रुपात समजू शकत नाही. त्याच्या ठिकाणी नसणारे अर्थ आपणांस दिसू शकतात. आणि असणा-या गुणधर्माकडे आपले दुर्लक्ष होऊ शकते, म्हणून वस्तुचे नेमके स्वरुप ठरविण्यात आपलया अनेक वैयक्तिक व सामूहिक चूका होऊ शकतात. परतु वस्तूंचे जे अर्थ आपणांस नव्याने कळतात व प्रतीत होतात ते आपणांस त्यांच्या .त्यांच्या ठिकाणी सापडण्यापूवीही होते व असतात, आणि जे अर्थ आपण चुकीने त्यांच्या ठिकाणी पाहतो ते त्यांच्या ठिकाणी पाहतो ते त्यांच्या ठिकाणी पूवी कधी नव्हतेही. या क्षणी आपणांस वस्तूच्या किंवा विषयांच्या ठिकाणी जे अर्थ प्रतीत होतात ते आपण उपस्थित नसतानाही त्यांच्या ठिकाणी चालू राहतील. विषयांचे अनेकांना ते जसे दिसेल, जाणवेल आणि जे असंख्य अर्थ प्रतीत होतील ते सर्व मिळून तो खुदद विषय किंवा ती वस्तू स्वत: असेल, म्हणजे ते सर्व मिळून तिचे स्वरुप असेल, कोणत्याही विशिष्ट व्यक्तीला विशिष्ट वेळी तिचा जो अर्थ जाणवतो तो तिच्या समग्र स्वरुपाचा एक छोटासा भाग असेल किंवा तिचे ते अंशरुप असेल.

## सार-विचार :

सार (Essences) हे नित्य, टिकाऊ व अविकारी असतात आणि त्यांचे स्वत:चे अर्थ त्यांना जाणणारे कोणी असोत की नसोत ती तशीच कायम व अबाधित राहातात, आणि ते ज्या मूर्त व संवेद्य रुपांनी व्यक्त होतात ती नसली तरी ती समान्ये किंवा सारे नित्य, अबाधित, अविकारी आणि शाशवत रुपात टिकून राहतात असे हुसेर्ल मानतो. हुसेर्लचे हे कलपनारुप विषय [सार] प्लेटोला अभिप्रेत असलेलया सामान्यांसारखे (Universals) असतात की काय असा प्रश्न स्वाभाविकपणे उभा राहतो. अशा प्रशनाला हुसेर्लचे उत्तर नकारार्थी आहे. तो प्लेटोची वास्तववादी भूमिका घेण्यास तयार नाही. ज्ञेय कलपनांना द्रव्यांचे किंवा वास्तव वस्तूंचे रुप व दर्जा देणे त्याला मुळीच मान्य नाही.

## अभिप्रेतता (Intentionality) :

आपलया मानसघटनावादी उपत्तीत वस्तुंचा व विषयांचा अर्थ लावण्यात तो मायनॉगच्या अभिप्रेत संदर्भाच्या (Intentional reference)उतपत्तीचा आधार घेतो. हुसेर्लच्या मते अभिप्रेतता जाणिवेच्या वैयक्तिक प्रकियेचा अंगभूत गुणविशेष (Intrinsic trait) असते, आणि अभिप्रेततेत ज्ञान-विषयाचा उललेख अपरिहार्यपणे अंतर्भूत असतो. मानसघटनाशास्त्रीय अन्वेषणाचे विषय अभिप्रेत विषय असतात. असे हुसेर्ल मानतो. मात्र अशा मनाने उभारलेलया वस्तूंना प्रत्यक्ष दिकालबद्ध जगात अस्तित्व असण्याचा दर्जा देण्यास मानसघटनाशास्त्रज्ञ बांधलेला नसतो. मानसघटनाशास्त्राच्या दृष्टीने या आदर्श वस्तूंच्या दर्जाला महत्व नसते. तर अशा वस्तूंचे त्यांच्या परस्परसंबधांच्या अनुषगाने अन्वेषण करता येते, आणि अशा वर्णक विशलेषणाचे परिणाम नाकारता येत नाहीत. आणि परस्परांना समजावून सांगता येतात. या वस्तुस्थितीला महत्व असते. मानसघटनाशास्त्रात निर्भेळ ज्ञान मिळण्यासाठी वस्तूंना त्या ज्या प्रकारची वास्तविकता व वस्तुनिष्ठता इष्ट व आवशयक असते तेवढीच त्यांच्याठिकाणी असते.

हुसेर्लची भूमिका म्हटल्यास काही प्रमाणात वास्वतवादी आणि काही प्रमाणात चिद्वादी आहे. वस्तूंच्या अस्तित्वाला आणि अर्थाला मनाची व जाणिवेची नितान्त व अपरिहार्य आवशयकता असते. यावर जोर देण्यात तो चिद्वादी भूमिकेचा अवलंब करतो. तर त्यांच्या अनुपस्थितीतही वस्तूंचे अस्तित्व व गुणधर्म व अर्थ नष्ट न होता ती अबाधित व कायम टिकून राहतात असे म्हणण्यात तो वास्तववादी भूमिकेचा पुरस्कर्ता बनतो. मानसघटनाशास्त्राची निशिचती जे



Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052*

साक्षात उपलब्ध होते त्यापेक्षा त्याला अधिक अभिप्रेत नसते असे मानण्यात सामावलेली आहे. वस्तुंना जाणीवनिरपेक्ष असे अस्तित्व तर असतेच, आणि जाणिवेच्या कक्षेत पर्याप्तपणे आणण्याची क्षमताही त्यांच्याठिकाणी असते असे मानसघटनाशास्त्र मानते. याप्रमाणे हूसेर्ल आभिप्रेतताधारित अर्थाच्या उपपत्तीचा पुरस्कार करतो.

## मानसघटनाशास्त्रीय पद्धती (The Phenomenological Method)



ज्याच्यावर सर्व शास्त्रांची, आणि त्यातही मुख्यत: तत्वज्ञानाची उभारणी करता येईल अशा सर्व गृहीत तत्वांपासून मुक्त असलेला अंतिम पाया प्रस्थापित करणे हे हुसेर्लचे ध्येय होते. त्याच्या मते सर्व बुद्विनिष्ठ विधानांचे वैध अंतिम उगमस्थान पाहण्यात किंवा निरीक्षणात (Seeing) असते. म्हणजे जी आद्य जाणीव अनुभवात अव्यवहितपणे उपलब्ध होणा-या गोष्टीना आपलयासमोर उघडया करुन ठेवते तीच सर्व ज्ञानाचे उगमस्थान असते. मानसघटनाशास्त्रीय पद्वतीचा आद्य आणि मूल नियम प्रत्यक्ष वस्तूंना जाऊन पोहोचणे हे आवशयक आहे असा आहे. आपणांस आपलया जाणिवेत वस्तू जशा दिसतात व प्रतीत होतात तशा स्वरुपात त्यांचा जो अर्थ असेल तो आपण समजतो. म्हणजे जे प्रदत्त (Given) असते ते आपलया जाणिवेला भासते म्हणून त्याला संवेद्र जग (Phenomena) किंवा Phenomena हा शब्द संवेद्य वस्तू व घटना यांच्या मागे एखादी अज्ञात वस्तू आहे असे निदेर्शित करीत नाही. मानसघटनाशास्त्राच्या दृष्टीने अज्ञात (Unknown) अशा कोणत्या तरी गोष्टीचा प्रशन उपस्थित होत नाही. मानसघटनाशास्त्र जे उपलब्ध होते ते भासरुप आहे की सत्य व वास्तव आहे असा विचार करुन त्याचे स्वरुप ठरविण्याचा प्रयत्न करण्याच्या भानगडीत न पडता काहीतरी दिलेले किंवा उपलब्ध आहे यावरुन समाधान मानून आपला विचार सुरु करते.

मानसघटनाशास्त्रीय पद्वती निगामी (Deductive)नाही, तशीच ती अनुभवनिष्ठही ाही. तिचे सार जे काही दिलेले (given) असेल ते निर्देशित करण्यात आणि त्याच्या स्पष्टीकरणात (Elucidation) सामावलेले असते. ती नियमांच्या साहाय्याने उपपादन करीत नाही, किंवा काही तत्वांपासून निगमन करत नाही. ती आलया जाणिवेला जे विषय म्हणून उपलब्ध व प्रतीत होते त्यावर सरळ आपले लक्ष केद्रित करते. म्हणजे पर्यायाने मानसघटनाशास्त्रीय पद्वतीचा खरा खरा रोख जे वास्तव किंवा वस्तुगत (Objective) असते त्याच्यावर असतो. असे करताना ज्ञात्याच्या मनात जे विविध भाव उसळतात व त्याला जे जे मनोव्यापार अनुभवायला मिळतात त्यांचाही ती जरी विचार व संशोधन करु शकत असली तरी तिचे मुख्य लक्ष्य ज्याचे ज्ञान होत असते,

त्याच्याविषयी संशय उतपन्न होतो, ज्याच्यावर प्रेम केले जाते किंवा ज्याचा द्वेष केला जातो असे सर्व काही जाणणे हे असते. शुद्व कलपनांचा खेळ करण्यात सुद्वा कलपना करण्याची कृती आणि ज्याच्या कलपना केलया जातात तो विषय यातही फरक करावयास पाहिजे, उदा. सेन्टॉर, सुरांचे प्रकार, 2 हा आकडा, एखादी वर्तुळासारखी आकृती यांसारख्या गोष्टी विषय (Objects) असतात. मानसिक कृती नसतात. अशा अर्थाने हुसेर्ल प्टोवादाचा अस्वीकार करतो. आणि सर्व ज्ञान प्रदत्तावर आधारलेले असलेच पाहिजे अशी अट घालत असलयाने तो स्वत:ला दृष्टार्थवादी (Positivist) म्हणवतो. परंतु दृष्टार्थवादी सत्ता ही फक्त जे जे दृष्य स्वरुपाचे असते त्याच्याशी एकरुप समजतात, हे मत हुसेर्लला मान्य नाही. जशी प्रत्येक विशिष्ट वस्तु सत्य असते तसेच अशा प्रत्येक गोष्टीमध्ये सार ही असते. अशा साराला हुसेर्ल A Pure Eidos म्हणतो.

## विज्ञानाचे प्रकार

हुसेर्लच्या मते **वस्तुनिष्ठ शास्त्र (Factual Science)** आणि **सारवादी शास्त्र (Essentialist Science)** अशी दोन प्रकारची शास्त्रे असतात. मानसघटनाशास्त्रीय विचारपद्वती एकेक मुद्दयाचे सुटे स्पटीकरण करीत जाते, आणि सारांच्या बौदिक अंतर्ज्ञानाच्या मदतीने ती पायरीपायरीने प्रगती करीत राहाते. कोणत्याही गृहीततत्वांचा आधार न घेता ही पद्वती शास्त्रंच्या मूळ पायावर हला चढविते. आणि अशा रीतीने आद्य तत्वज्ञान (First Philosophy) बनते. तशीच

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052*

ती अत्यंत काटेकोर व अचूक शास्त्र म्हणून कार्य करते. ही पद्वती वापरण्यास अवघड आणि किचकट असते, परंतु तिच्यामुळेच असामान्य स्वरुपाचे आणि उपयुक्त संशोधन करण्याला मदत होते.

## निराकरण (Elimination) आणि ब्रॅकेटिंग :

आपलया अनुभवातील विशिष्ट व वास्तव घटनांचे निराकरण (Elimination) करणे यालाच तो ब्रॅकेटिंग (Bracketing) म्हणतो. हे तंत्र मानसघटना शास्त्रीय पद्धतीचे सारभूत अंग असते. कारण असे करण्याने तात्विक अन्वेषणाचा जो मुख्य व सारभूत विषय आणि आदर्श भाग असतो. त्यावर आकस्मिकतेचा भाग दर करुन लक्ष केंद्रित करता येते. मानसघटनाशास्त्राचा विशिष्ट वास्तव घटनांशी संबंध नसतो. तर विशिष्टांमधून जी आदर्श व कलपनारुप सारे प्रकाशमान होतात त्यांचा त्याला प्रामुख्याने विचार करावयाचा असतो.

अनुभवातील वास्तव घटना काढून टाकून त्याचे शुद्धीकरण करण्यासाठी हुसेर्ल वारंवार निर्णय विलंबन (Suspension of Judgement Epoche) या शब्दाचा उपयोग करतो. मानसघटनाशास्त्रीय पद्धतीच्या अभिवृत्तीचे हे विशेष लक्षण आहे की जाणिवेला होणा-या पुरोधानाचे. म्हणजे जाणिवेला जाणावणा-या भौतिक किंवा मानसिक गोष्टीचा आस्तित्वाविषयी प्रारंभी ती कोणताही निर्णय किंवा विधान करणे लांबणीवर टाकते. ती प्रारंभी त्याच्या स्वरुपाविषयी कोणतीही निशिचत भूमिका व दृष्टीकोन घेण्याचे टाळते. आणि कोणताही निर्णय करण्याची घाई करणे अनिष्ट मानते. अनुभवाच्या सारभूत रचनेचे अन्वेषण व्यवस्थित रीतीने करता यावे, म्हणून ती सातत्याने मानसघटनाशास्त्रीय पद्वतीने अस्तित्वाचे निराकरण किंवा निष्कासन करण्याची काळजी घेत असते. म्हणजे मानसशास्त्रीय तंत्राचा यशस्वीपणे आणि परिणामकारकपणे उपयोग करण्यासाठी त्याला गणिताचे फार फलदायी मार्गदर्शन मिळाले. कारण शुदध गणितशास्त्र दिक आणि परिणाम यांच्या आपलया अनुभवाच्या वास्तविक घटनांचा आणि आस्तित्वाच्या अंगाचा पद्वतशीरपणे निराकरण करुन आपले लक्ष केवळ कलपनात्मक (Ideal) संबंधावर केंद्रित असते.

हुसेर्ल म्हणतो की मानसघटनाशास्त्र हे गाणितासारखे शक्यतांचे [Possibilities)शास्त्र आहे. आणि ते सर्वत्र वास्तव घटनांच्या शास्त्राच्या आधी येते. अशा रीतीने आपलया अनुभवातील वास्तवतेचा सर्व भाग बाजूला काढून व वगळून किंवा त्याचे निराकरण करुन जो शिललक राहिलेला कलपनारुप भाग आपणांस पाहावयास मिळतो त्याचे विशलेषण आणि वर्णन मानसघटनाशास्त्र करीत असते.

निराकरणाच्या प्रक्रियेत हुसेर्ल कातेशिअन संशयाचा आश्रय न घेता, स्वतंत्र निर्णय करण्याचे निलंबन (Suspension)करतो. याचा अर्थ तो आपलया अनुभवात आपणांस उपलब्ध होणा-या काही विशिष्ट वास्तव घटना गाळतो किंवा त्याच्याकडे दुर्लक्ष करुन त्यांना बाजूला सारतो (Brackets) आणि त्यांच्याविषयी आस्था दाखवीत नाही. मानसघटनाशास्त्रज्ञ स्वत: वस्तुंचे (die sachen selbst) आकलन करुन घेण्यास उत्सुक असलयाने इतर लोक काय म्हणतात हे जाणून घेण्यात त्याला स्वारस्थ वाटत नाही. आणि म्हणून तो सर्व [ऐतिहासिक] उपलब्ध सिद्वान्तांना बाजूला सारतो, म्हणजे त्यांच्या दृष्टीकानातून व अनुरोधाने घटनांकडे पाहण्याचे टाळतो. कारण त्याला सत्तेचे स्वत: स्वतंत्रपणे दर्शन ध्यावयाचे असते. या प्रकियेला तो काल्पनिक रुपांतरण (Eidetic Reduction) म्हणतो, आणि प्रारंभी अशी चाळणी लावलयाने वस्तूच्यां किंवा विषयांच्या सर्व विशिष्ट व वास्तविक भागांचे निराकरण केलयानंतर मानसघटनाशास्त्राला सारांवर आपले लक्ष केंद्रित करणे सोयीचे व शक्य होते.

अशा वास्तविकतेच्या आणि विशिष्टांच्या निराकरणात निसर्गाच्या व मनाच्या सर्व शास्त्रांचे, त्यांच्या वास्तविक निरीक्षंणाचे आणि सामान्यीकरणांचे निराकरण अंतर्भूत होत असते. अस्त्विाचे अधिष्ठान म्हणून समजलया जाणा-या ईष्वराचेही अशा रीतीने वर्णन केले जाते. एवढेच नव्हे तर तर्कशास्त्र आणि कलपनात्मक शास्त्रे याच रीतीने वगळली जातात कारण माहिती देणा-या सर्व गोष्टीना बाजूला सारुन व दुर्लक्षून मानसघटनाशास्त्र शुद्व सारांना साक्षात सामोरे जाते, आणि सारांशी स्वत: प्रत्यक्ष परिचय करुन घेते. हुसेर्लची मानसघटनाशास्त्रीय पद्वती अनुभवपूर्व पद्वती असून ती विषयाला अनुभवाच्या आशयापासून वियोजित करते, आणि त्या पद्वतीने अस्तित्वाऐवजी शुद्व सारांचे

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052*



अतंर्ज्ञानाने आकलन करते.

## शुद्ध [अमिश्र] जाणीव (Pure Consciousness) :

### अतीत रूपांतरण (Transcendental Reduction) :

मानसघटनाशास्त्रीय पद्धती ज्ञाता आणि त्याच्या किया यांना लागू केली जाते. हुसेर्लच्या मते मानसघटनाशास्त्राची जी अनेक क्षेत्रे व कक्षा आहेत त्यापैकी तो अस्तित्वाचे एक क्षेत्र शुद्ध जाणिवेला (Pure Consciousness)बद्दल करतो. हुसेर्ल अभिप्रेततेची संकलपना ब्रन्टानोपासून आणि अप्रत्यक्षपणे स्कोलॅस्टिझमपासून स्वीकारुन तिच्या साहाय्याने शुद्ध जाणिवेप्रत जाऊन पोहोचतो. काही अनुभवांचा हा सारभूत गुण असतो. की अनुभव हे विषयाचे (of an Object) असतात. आणि [प्रेम, गुणग्रहण यांसारखे] हे अनुभव कशाचीतरी जाणीव असते. आणि ते अभिप्रेततेद्वारा विषयांशी सलग्न असतात. आणि त्यांना **अभिप्रेततानुभव** (Intentional Experiences) म्हणतात. अशा अभिप्रेततानुभवांना अतीत रुपांतरणाची पद्धती लागू केलयाने असे आढळते की जाणिवेच्या किया जिचे विषय असतात ती जाणीवच असते. आणि जाणिवेव्यतिरीक्त इतर सर्व वस्तूंचे अस्तित्व जरी नाहीसे झाले तरी सर्वोच्यावर जाणीव ही उरतेच. आणि तिचे अस्तित्व नाकारायचे झाले तरी नाकारण्याची किया जाणीवच व्यकत करते. म्हणजे जाणिवेला आद्यनिशिचती असते. जिचा विचारांशी संबंध नाही अशी कोणतीही जाणिवेची किया जाणिवेचे अस्तित्व गृहीत धरलयाशिवाय आणि आत्मव्याघात केलयाशिवाय आपणांस नाकारता येत नाही. हुसेर्लच्या शब्दात सांगावयाचे झालयास अंकगणिताच्या सत्यासंबंधीचे निर्णय आपणांस स्थगित करता येणार नाहीत.

## मानसघटनाशास्त्रीय चळवळ :

हुसेर्लच्या मानसघटनाशास्त्रीय पद्धतीवर आधारलेलया मानसघटनाशास्त्राला युरोप आणि अमेरिकेत यशस्वी प्रतिसाद आणि अनुदायित्व लाभले, आणि मानसघटनाशास्त्राचा एक स्वतंत्र तात्विक चळवळ उदयास आली. हुसेर्लच्या शिष्यांनी त्याच्या मानसघटनाशास्त्रीय पद्धतीचा केवळ मानसशास्त्रातच नव्हे तर सत्ताशास्त्र, गणितशास्त्र, इतिहास, कला, समाजशास्त्र, धर्म इत्यादी क्षेत्रांतही विशलेषण आणि वर्णन करण्याचे एक तंत्र म्हणून यशस्वीपणे उपयोजन करुन मानसघटनाशास्त्राला एका नव्या तत्वज्ञानाचा व तात्विक संप्रदायाचा दर्जा प्राप्त करुन दिला.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner